सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १७४ | मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**दिनविशेष**
१७ मार्च

- सायना नेहवाल भारतीय बॅडमिंटनपटू, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# लाडकी बहीण योजनेतून ९० लाख नावे बाद!

## तुमच्या हप्त्याचे काय? यादीत नाव तपासा 'असे'



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत मोठी खळबळ उडाली आहे. राज्य सरकारने केलेल्या डिजिटल पडताळणीनंतर तब्बल ९० लाख लाभार्थ्यांची नावे यादीतून हटवण्यात आली आहेत. या निर्णयामुळे कोट्यवधी महिलांमध्ये चिंतेचे वातावरण असून, आता केवळ पात्र महिलांनाच दरमहा १५०० रुपये मिळणार आहेत. तुमचे नाव यादीत कायम आहे की नाही, हे तपासण्यासाठी सरकारने नवीन प्रक्रिया जाहीर केली आहे.

**९० लाख नावे का हटवली?**

सरकारी आकडेवारीनुसार, सुरुवातीला २. ६ कोटी अर्ज आले होते. मात्र, आता ही संख्या १. ५३ कोटींवर आली आहे. पडताळणीत काही त्रुटी आढळल्या. **उत्पन्न मर्यादा :** ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २. ५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. **चारचाकी वाहन :** घरात चारचाकी गाडी असलेल्या अपात्र अर्जांची छाटणी. **दुबार अर्ज :** एकाच महिलेने दोनदा केलेले अर्ज. **बोगस नोंदी :** पुरुष अर्जदार आणि सरकारी कर्मचाऱ्यांनी केलेले अवैध अर्ज.

**तुमचे नाव यादीत आहे का? असे तपासा (स्टेप बाय स्टेप)**

**१. अधिकृत वेबसाइटला भेट द्या :** ladakibahin.maharashtra.gov.in वर जा. **२. लॉगिन करा :** तुमचा नोंदणीकृत मोबाईल नंबर, पासवर्ड आणि कॅप्चा टाकून 'Applicant Login' करा. **३. अर्ज पहा :** 'यापूर्वी केलेले अर्ज' (Applications Made Earlier) या विभागात जा. **४. स्टेटस चेक करा :** येथे तुमचा अर्ज 'Approved' (मंजूर), 'Pending' (प्रलंबित) किंवा 'Rejected/Removed' (बाद) आहे का ते तपासा. **५. कारण तपासा:** जर अर्ज बाद झाला असेल, तर 'Remarks' कॉलममध्ये त्याचे कारण दिले असेल. अर्ज दुरुस्तीसाठी आता ही शेवटची संधी! ज्या महिलांचे अर्ज कागदपत्रांच्या कमतरतेमुळे बाद झाले आहेत, त्यांना ३१ मार्च २०२६ पर्यंत दुरुस्ती करण्याची मुदत देण्यात आली आहे. 'नारी शक्ती दूत' ॲप किंवा जवळच्या सेतू केंद्रावर जाऊन तुम्ही ई-केवायसी पूर्ण करू शकता.

# प्रताप महाविद्यालयातील वसतिगृह समस्यांच्या विळख्यात!

## राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसतर्फे चेअरमन, संचालक, प्राचार्यांना निवेदन



*अमळनेर : वसतीगृहाच्या समस्यांबाबत खा. शि. मंडळाचे चेअरमन सी. नीरज अग्रवाल, संचालक योगेश मुंदडा यांना निवेदन देताना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे पदाधिकारी. (समस्यांचे छायाचित्रे पान २ वर...)*

**विद्यार्थ्यांच्या मागण्या**

संपूर्ण वसतिगृहाची तात्काळ पाहणी करून आवश्यक दुरुस्ती कामे सुरू करण्यात यावीत. विद्युत व्यवस्था सुरक्षित करून नवीन इलेक्ट्रिक बोर्ड बसविण्यात यावेत. खराब बेड व पंखे दुरुस्त करून आवश्यकतेनुसार नवीन उपलब्ध करून द्यावेत. सर्व बाथरूममध्ये दरवाजे बसवून नियमित स्वच्छतेची कायमस्वरूपी व्यवस्था करावी. वसतिगृह परिसरात नियमित साफसफाई व निर्जंतुकीकरण करण्यात यावे. शुद्ध पिण्याच्या पाण्याची व इतर मूलभूत सुविधांची योग्य व्यवस्था करावी.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील वस्तीगृह विविध समस्यांच्या विळख्यात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत येथील राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसतर्फे सोमवार, दि. १६ मार्च रोजी प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, खानदेश शिक्षण मंडळाचे चेअरमन सीए नीरज अग्रवाल, संचालक योगेश मुंदडा व चिटणीस प्रा. पराग पाटील यांना निवेदन देण्यात आले.

निवेदना म्हटले आहे, की वसतीगृहात मुलभूत सुविधांचा अभाव आहे. नियमित स्वच्छता होत नाही. याचा विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. या समस्या तात्काळ मार्गी लावून विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ व सुसज्ज वातावरण उपलब्ध करून द्यावे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व राहणीमान सुधारण्यासाठी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस नेहमीच विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील. समस्या निकाली न लागल्यास पुढील काळात लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी यिनचे अध्यक्ष कुशल पाटील, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष कुणाल पाटील, करण साळुंखे, विवेक निकम, गौरव सोनटके, हर्ष पाटील, समाधान चव्हाण, विशाल पाटील, तुषार पाटील, गौरव चौधरी, समीर पाटील तसेच वस्तीगृहातील विद्यार्थी उपस्थित होते. निवेदनाची प्रत आमदार अनिलदादा पाटीलय यांनाही देण्यात आली आहे.

**वसतिगृहातील प्रमुख समस्या धोकादायक विद्युत व्यवस्था :**

अनेक खोल्यांमधील इलेक्ट्रिक बोर्ड खराब अवस्थेत आहेत. काही ठिकाणी उघडे आहेत. त्यामुळे शॉर्टसर्किट अथवा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**बाथरूम व स्वच्छतेचा अभाव**


बाथरूम अत्यंत अस्वच्छ अवस्थेत असून काही ठिकाणी दरवाजे तुटलेले आहेत. नियमित साफसफाई होत नसल्याने दुर्गंधी व अस्वच्छ वातावरण निर्माण झाले आहे.

**स्वच्छता व आरोग्यविषयक समस्या**

वसतिगृह परिसरात नियमित स्वच्छतेचा अभाव असल्यामुळे कचरा, ओलसर भिंती व निघालेले प्लास्टर यामुळे परिसर अस्वच्छ व आरोग्यास अपायकारक बनला आहे.

**पिण्याचे पाणी**

काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समाधानकारक व्यवस्था नाही. वॉटर बेसिन, नळ व इतर सुविधा देखील निकृष्ट अवस्थेत आहेत.



## प्रा. एम. डी. कुळकर्णी यांचे पुणे येथे निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक एम. डी. कुलकर्णी (वय ८४) यांचे नुकतेच पुणे येथे निधन झाले. प्रा. एम. डी. कुळकर्णी यांनी प्राध्यापकांच्या अन्यायाविरूध्द आवाज उठविला होता. त्यांच्या हक्कासाठी ते लढले होते. त्यांची जीवनशैली अत्यंत शिस्तबध्द होती. अर्थशास्त्रातील सर्व सिध्दांत त्यांचे तोंडपाठ होते. ज्ञानाचे एक वलयच हरपल्याच्या भावना व्यक्त होत आहेत. प्राध्यापक संघटनेकडून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

## गोऱ्हा विकणाऱ्या तिघांना न्यायालयीन कोठडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कत्तलीसाठी गोऱ्हा नेणाऱ्या तीन जणांना गो रक्षकांनी रंगेहात पकडले होते. त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली होती. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

शनिवार, दि. १४ मार्च रोजी दुपारी अडीचच्या सुमारास पोलीस कॉन्स्टेबल अविनाश भदाणे हे शाहआलम नगर मधील आयटीआय कॉलेज जवळ पेट्रोलिंग करीत होते. यावेळी गो रक्षक सचिन महाजन, पवन बारी यांनी वाहन (एमएच५४ओ१२२) मध्ये एक गोऱ्हा कत्तलीसाठी नेला जात आहे, अशी माहिती दिली. अविनाश भदाणे यांनी ही बाब पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना सांगितली. त्यांच्या मार्गदर्शनाने वाहन चालक बंटी उर्फ विजय कैलास धनगर (वय २२ रा. ताडेपुरा) याची चौकशी करण्यात आली. तो विना परवानगी, वैद्यकीय चाचणी न करता गोऱ्हा वाहतूक करीत असल्याचे आढळून आले. गोऱ्ह्याचे मालक वासरे येथील नामदेव परमेश्वर पाटील व शरद रतीलाल पाटील यांनी पैशांच्या गरजेपोटी मोईन नावाच्या व्यक्तीला गोऱ्हा विकण्यासाठी नेत होतो असे चौकशीत स्पष्ट झाले. याप्रकरणी पोलिसांनी चालकांसह गोऱ्हा मालकावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली होती. पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज पुढील तपास करीत आहेत.

**गुरख्यांनीच विकल्या तीन गायी; दोघांवर गुन्हा दाखल**

गायींचे पालनपोषण करून रक्षण करणारे गुराखीच भक्षक बनले आहेत. गुराख्यांनीच चक्क तीन गायी परस्पर विकल्या आहेत. ही घटना शिरुडनाका परिसरात गुरुवार, दि. १२ मार्च रोजी उघडकीस आली आहे. याबाबत गोभक्तांसह वन्यप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे. राजेंद्र सुपडू पाटील, नीलेश प्रकाश सूर्यवंशी व कृष्णा रतन ठाकरे यांनी त्यांच्या गायी सागर श्याम परदेशी (रा. राजाराम नगर) व भय्या भगत (रा. बोरसे गल्ली) यांना चारण्यासाठी दिल्या होती. राजेंद्र पाटील यांची गाय चराई करून परत न आल्याने त्यांनी गुराख्यांना विचारपूस केली. त्यावेळी त्यांनी 'तुमची गाय कोठे पळून गेलीआम्हाला माहीत नाही' असे सांगितले. त्यानंतर राजेंद्र पाटील यांना त्यांच्या मित्राने तुमची गाय दोघांनी कोणाला तरी विकून टाकली आहे, अशी माहिती दिली. त्यानंतर अधीक चौकशी केली असता की कृष्णा ठाकरे व नीलेश सूर्यवंशी यांच्याही गायी त्यांनी विकून टाकल्याचे निष्पन्न झाले.

**व्यापारी लूट प्रकरण**

## 'एलसीबी'कडून धुळ्याच्या आरोपीस नाशिक येथे अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : स्कुटीवर जाणाऱ्या व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरची पावडर फेकून साडेपाच लाख रुपयांची पिशवी लांबविण्यात आली होती. ही घटना २५ फेब्रुवारी रोजी घडली होती. या प्रकरणातील तीन चोरट्यांपैकी एकास नाशिक येथून अटक करण्यात 'एलसीबी' पोलिसांना यश आले आहे.

मनोज अधिक मोकल (वय २५ रा. मोहाडी, धुळे) असे त्या संशयित आरोपीचे नाव आहे. व्यापारी यतीन कोठारी हे स्कुटीवरून पिंपळे रस्त्यावरील लामा जीनमध्ये जात होते. यावेळी तीन जण मोटरसायकलवर तोंडाला मास्क लावून आले. त्यांनी आधी यतीन कोठारी यांचा चष्मा काढून फेकला. त्यानंतर त्यांच्या डोळ्यात मिरची पावडर फेकली. त्यांच्याजवळील साडेपाच लाख रुपयांची पिशवी खाली पडली. चोरटे ती पिशवी घेऊन पिंपळे रस्त्याने मंगरूळमार्गे फरार झाले. व्यापारी कोठारी यांनी पोलिसांना कळविल्यावरून पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी आरोपींच्या शोधासाठी पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, हेडकॉन्स्टेबल मिलिंद सोनार, विनोद संदानशिव, नीलेश मोरे यांचे पथक रवाना केले होते. सीसीटीव्ही फुटेजमध्ये तिन्ही आरोपी कॅमेऱ्यात कैद झाले होते. अवघ्या एका तासात शोध पथकाने फुटेजच्या वर्णनावरून आरोपींचा मागोवा घेतला असता ते धुळ्याचे असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस आरोपींच्या घरापर्यंत पोहचले. मात्र, आरोपी पळून गेले होते. एलसीबी पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र वलटे, पोलीस कॉन्स्टेबल संदीप पाटील, प्रवीण मांडोळे यांनी आरोपीचा मागोवा घेतला असता एक आरोपी मनोज मोकल हा त्यांना नाशिक येथे आढळून आला. पोलिसांनी त्याला नाशिक येथून अटक करून येथील पोलीस ठाण्यात आणले आहे.

# 'एलपीजी'चे टेन्शन तर काहीच नाही, खरा 'बॉम्ब ब्लास्ट' बाकीच...!

## एक एप्रिलपासून लागणार युद्धाची झळ, 'या' १५ वस्तू महागणार



**शूज, कपडे आणि रंगही महाग होणार!**

सिंथेटिक फायबर आणि पेंट्समध्ये पॉलिमरचा वापर होतो. त्यामुळे या वस्तूंच्या किमती ९- १० टक्क्याने वाढू शकतात. वुडलँड इंडियासारख्या कंपनीने ८- १२ टक्के वाढीची शक्यता वर्तवली आहे. बर्जर पेंट्सनेही ५ टक्के किंमत वाढ जाहीर केली आहे. उद्योगातील तज्ज्ञ सांगतात की, पुरवठा साखळीतील अनिश्चितता आणि इनपुट खर्च वाढल्याने कंपन्यांकडे किंमत वाढवण्याशिवाय पर्याय नाही.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इराण- इस्त्रायल युद्धाची आग आता भारताच्या खिशापर्यन्त पोहोचली आहे. १ एप्रिलपासून अनेक रोजच्या वस्तू आणि मोठ्या खरेदीच्या वस्तू महाग होणार आहेत. एलपीजी संकट तर काहीच नाही, असे म्हणायला सुरुवात झाली आहे. कारण खरा बॉम्ब ब्लास्ट अजून बाकीच आहे.

कच्च्या तेलाच्या किमतींमुळे प्लास्टिक, पॉलिमर आणि इतर कच्च्या मालाच्या किमती २५ टक्के पर्यंत वाढल्या आहेत. इराण- इस्त्रायल युद्धामुळे आखाती भागात तणाव वाढला आहे. याचा थेट परिणाम जागतिक पुरवठा साखळीवर झाला. कच्च्या तेलाच्या डेरिव्हेटिव्ह्ज म्हणजे प्लास्टिक, पॉलिमर, रेझिन यांच्या किंमती झपाट्याने वाढल्या. आंतरराष्ट्रीय शिपिंग खर्च ७-१० टक्केने वाढला आहे. शिवाय, रुपयाचे डॉलरच्या तुलनेत अवमूल्यन झाल्याने आयात महाग झाली. याचा फटका भारतात उत्पादित होणाऱ्या अनेक वस्तूंना बसणार आहे. कार, दुचाकी, टीव्ही, फ्रीज, एसी यांसारख्या वस्तूंच्या किमती ५- ६ टक्केने वाढू शकतात. ऑटो कंपन्या २-३ टक्के किंमती वाढवण्याची तयारी करत आहेत. मर्सिडीज-बेंझ आणि ऑडी यांनी १ एप्रिलपासून २ टक्के किंमती वाढवण्याची अधिकृत घोषणा केली आहे. इतर मोठ्या कंपन्या देखील नवीन किंमती ठरवत आहेत.

इलेक्ट्रॉनिक्स आणि गृहोपयोगी उपकरणांमध्ये प्लास्टिकचे भाग खूप असतात. त्यामुळे टीव्ही, रेफ्रिजरेटर, एअर कंडिशनर यांच्या किमती ५- ६ टक्क्याने वाढण्याची शक्यता आहे. गोदरेज एंटरप्रायझेससारख्या कंपन्यांनी सांगितले की, कच्च्या मालाच्या किमती झपाट्याने वाढल्या असून एप्रिलपासून ५- ६ टक्के किंमत वाढ धक्कादायक आहे. मार्चमध्ये विक्रीचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी काही कंपन्या किंमत वाढ टाळत आहेत. मात्र, एप्रिलपासून ही आग खिशात पोहोचेल. रोजच्या आयुष्यातील अनेक वस्तू महाग होणार आहेत. ग्राहकांना आता बजेट काळजीपूर्वक करावे लागेल. ही युद्धाची आग फक्त तेलातच नाही तर आपल्या घराघरात पोहोचली आहे

## संपादकीय

### अल्पसंख्याकांच्या नावाने आबादानी!

'अल्पसंख्याकांचे लांगुनचालन करणारे सरकार' हा आरोप २०१४ नंतर देशात आणि २०१५ नंतर राज्यात फार कमी होतो. राज्यातील सरकारची प्रतिमा बहुसंख्याकांचे हित जोपासणारे, अशी झालेली आहे. मात्र याच सरकारने अल्पसंख्याक असा दर्जा शाळा तसेच संस्थांना देण्याबाबत हात खूपच सैल सोडलेला दिसतो. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे सारे राज्य शोकसागरात बुडाले असताना अल्पसंख्याक दर्जाचे प्रकरण गाजले. त्या खात्याचे मंत्री असलेले दादा हयात नसताना असा दर्जा कुणी बहाल केला, असा प्रश्न उपस्थित झाला व सरकारने लगेच या निर्णयाला स्थगिती दिली. असा दर्जा देण्याचे आदेश काढणाऱ्या सहसचिवाची तातडीने बदली करण्यात आली. नंतर असे लक्षात आले, की दादांनीच ही फाईल मंजूर केली होती व ऑनलाइन सेवा बंद असल्याने केवळ आदेश निघाले नव्हते. मात्र यानिमित्ताने हे दर्जा प्रकरण नेमके काय याबाबत मिळणारी माहिती धक्कादायक आहे. केंद्र सरकारने १९९२ मध्ये लागू केलेल्या कायद्यानुसार मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी व जैन या धर्मांतील लोकांनी काढलेल्या शिक्षण संस्थांना 'अल्पसंख्याक' असा दर्जा मिळतो. राज्याच्या पातळीवर या सहा धर्मांसह 'भाषिक अल्पसंख्याक' अशी श्रेणी जोडली गेली. यात हिंदी, कन्नड, मल्याळम, गुजराती, सिंधी, उर्दू, मारवाडी व गुजर भाषा बोलणारे संस्थाचालक समाविष्ट झाले. अल्पसंख्य या शब्दाची व्याख्या करायला गेले तर हेही योग्यच. केंद्राच्याच कायद्यानुसार अशा संस्थांना भरपूर अनुदान मिळते. त्या संस्थांच्या शाळा अनुदानित या व्याख्येत बसणाऱ्या असल्या तर. शिवाय या संस्थांमधील प्राध्यापक व शिक्षक भरतीत सरकारला हस्तक्षेप करता येत नाही. म्हणजे 'पवित्र पोर्टल' पासून सुटका. या संस्थांना असा दर्जा मिळवण्यासाठी अटी दोनच. त्यावर ५० टक्क्यांपेक्षा जास्त संचालक अल्पसंख्याक या कक्षेत येणारे असावेत व या शाळांमध्ये शिक्षण घेणारे ५० टक्के विद्यार्थी अल्पसंख्य प्रवर्गातून येणारे असावेत.


केंद्र व राज्यात सह किंवा उपसचिव दर्जाचा अधिकारी त्यासाठी प्राधिकृत करण्यात आला. किमान महाराष्ट्राचा विचार केला तर सुरूवातीला ही व्यवस्था उत्तमरीत्या कार्यरत होती. नंतर राज्यभरातील चाणाक्ष शिक्षणसम्राटांच्या लक्षात असे आले की संस्थेच्या कार्यकारिणीत ५० टक्के अल्पसंख्याक संचालकांचा भरणा केला तर सहज हा दर्जा मिळवता येऊ शकतो. चालबाजी सुरू झाली ती येथून. कार्यकारिणीवर अल्पसंख्य घेतले तर ५० टक्के अल्पसंख्य विद्यार्थी कुठून आणायचे हा मुद्दा यातला प्रमुख अडसर होता. मग शिक्षणसम्राट कामाला लागले. त्यांनी अल्पसंख्याक मंत्रालयात संधान साधून एक नवा आदेश काढला. त्यात केंद्राने नमूद केलेली ही विद्यार्थ्यांची अटच वगळण्यात आली. त्यामुळे विद्यार्थी कुठून आणायचे हा प्रश्न आपसूकच मिटला. यानंतर असा दर्जा मिळवण्याचे प्रस्ताव शेकड्याने सरकारकडे सादर होऊ लागले. लगोलग ते मंजूरही होऊ लागले. महाराष्ट्रात २००९ या वर्षापासून आजतागायत सहा हजारांच्या आसपास संस्था अल्पसंख्य झाल्या. हा आकडा बघून अनेकांचे डोळे विस्फारतील. याचे कारण शिक्षण हक्कासाठी लागू केलेल्या आरटीईच्या अंमलबजावणीत दडले आहे. ती त्याच वर्षीपासून सुरू झाली. राज्यात खरोखर इतके अल्पसंख्य विद्यार्थी शिक्षण घेतात का असा प्रश्न कुणालाही पडावा. याचे उत्तर नाही असेच येते. मुळात राज्यातील अल्पसंख्याक खात्याला तुटपुंजा निधी मिळतो. या खात्याकडे फारसे काम नाही. त्यामुळे ते घ्यायला कुणी मंत्री तयार होत नाही. मात्र या संस्थांची यादी, त्यांना मिळणाऱ्या सवलती बघून मंत्र्याचे डोळे विस्फारले. खऱ्या वादाला सुरूवात झाली ती येथून. अजितदादांच्या आधी हे खाते ज्या नाशिकच्या नेत्याकडे होते त्यांनी आदेश काढला. या दर्जाच्या फाईली माझ्या मंजुरीशिवाय मान्य करायच्या नाहीत म्हणून. तेव्हा कार्यरत असलेल्या सहसचिवांनी यावर आक्षेप घेतला. केंद्राचा आदेश दाखवला. मंत्र्यांना फाईल दाखविण्याची कुठलीही तरतूद नाही. तसे केले तर तो केंद्रीय कायद्याचा भंग ठरेल असे सांगितले. पण मंत्री ऐकायला तयार नव्हते. अखेर सहसचिवाची बदली झाली. त्याजागी दुसरे आले. त्यांचाही तसाच छळ सुरू झाला. पण योगायोग असा की गेल्या हिवाळी अधिवेशनाच्या काळात त्यांनी चक्क आत्महत्या केली.

केवळ याच कारणासाठी या खात्यातील सात सहसचिव आजवर बदलले गेले. ऐकत नाही का मग करा बदली, असा प्रकार सुरू झाला. नंतर या मंत्र्यालाच न्यायालयाच्या निर्णयामुळे घरी जावे लागले व शेवटी दादांकडे हे खाते आले. दादा खमके निघाले. त्यांनी सहसचिवांना पुन्हा अधिकार बहाल केले, फक्त अट एवढीच घातली की दर्जा बहाल करताना कुठलाही गैरव्यवहार करायचा नाही. कुणाकडूनही पैसे घ्यायचे नाहीत. सारी कागदपत्रे नीट बघायची. यातली गंमत अशी की या दर्जासाठी इच्छुक असलेल्या संस्था कागदपत्रे तयार करण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत. त्यांना करायचे काय असते तर संस्थेच्या कार्यकारिणीवर असलेल्या काहींना काढून अल्पसंख्याकांना घ्यायचे. विद्यार्थ्यांचा मुद्दा तर राज्य शासनानेच निकाली काढलेला. यामुळे झाले काय तर राज्यातले मारवाडी, सिंधी, गुजराथी, शीख, गुजर, मल्याळी, कन्नड, हिंदी हे भाषिक व धार्मिक दृष्टीने अल्पसंख्याक असलेले लोक मोठ्या संख्येने शिक्षणसम्राट होऊ लागले. सरकारने असा दर्जा दिलेल्या संस्थांची यादी बघितली की हे सहज लक्षात येते. यातही २०२१ नंतरच्या चार वर्षांत ज्या तीन हजारांहून अधिक शिक्षण संस्थांना असा दर्जा मिळाला. त्यात मुस्लीम व ख्रिश्चन अल्पसंख्याकांच्या संस्था फारच कमी आहेत. संस्थेला एकदा दर्जा मिळाला की त्यांच्या शाळा, महाविद्यालये वेगळ्या श्रेणीत येतात. अशांची संख्या भरपूर. त्यामुळे सध्या संपूर्ण राज्यातच अल्पसंख्याक शाळांचा सुळसुळाट झालेला दिसतो. त्यात विद्यार्थी कोणते शिकतात तर बहुसंख्याक समाजातीलच. ही बनवेगिरी उघडपणे सुरू आहे. मुळात अल्पसंख्याक दर्जा देण्यामागे सरकारचा उद्देश होता तो अजूनही मागास असलेल्या अल्पसंख्याक समाज व धर्मातील मुलांनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे. शिक्षित व्हावे. प्रगती साधावी. तो कधीचाच धुळीला मिळाला. शिक्षणसम्राटांनीच यातून आर्थिक प्रगती साधली. आजवरच्या या खात्याच्या मंत्र्यांनी स्वतःची सोय करून घेतली ती वेगळीच. अल्पसंख्याकांच्या नावावर स्वतःच्या आबादानीकडेच लक्ष पुरविणाऱ्या या संस्थाचालकांना चाप लावण्याची हिंमत सरकारमध्ये आहे का हा यातील कळीचा मुद्दा.

# गॅस तुटवड्यावर राज्य सरकारचा तोडगा, पेट्रोल पंपावर देणार केरोसिन...!

## मंत्री ना. छगन भुजबळांची विधिमंडळ अधिवेशनात घोषणा...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



राज्यात घरगुती गॅस अर्थात एलपीजी तुटवड्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर उतारा काढण्यासाठी आता राज्य सरकारकडून बाजारपेठेत मोठ्याप्रमाणावर केरोसिन आणण्याची योजना आखण्यात आली आहे. जेणेकरुन सामान्य नागरिकांना वेळेवर गॅस सिलिंडर न मिळाल्यास केरोसिनचा वापर करता येईल. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ यांनी सोमवार, दि. १६ मार्च रोजी यासंदर्भात विधिमंडळाच्या अधिवेशनात निवेदन मांडले.

छगन भुजबळ यांनी राज्यातील गॅस टंचाईबाबत भाष्य करताना म्हटले की, मी बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल या पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींशी सकाळी चर्चा केली. त्यांनी राज्यातील घरगुती गॅसचे दैनंदिन उत्पादन ९ हजार वरुन ११ हजार मेट्रिक टनपर्यंत वाढवल्याचे सांगितले. तसेच एलपीजी उत्पादनातील सगळ्या अडचणी दूर करण्याचे काम सुरु असल्याचे या कंपन्यांकडून सांगण्यात आले. सध्याच्या गॅस टंचाईतून मार्ग काढण्यासाठी घरगुती गॅसच्या उत्पादनाला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानंतर गॅस उरलाच तर रुग्णालये, शैक्षणिक संस्था, वृद्धाश्रम, स्मशानभूमी यांना एलपीजी उत्पादनात १०० टक्के प्राधान्य दिले जाईल. औषध उद्योगासाठी आणि संरक्षण क्षेत्रातील उपहारगृहांना एलपीजी वितरणात ५० टक्के प्राधान्य आहे. राज्यात केरोसिनचा भरपूर साठा आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना केरोसिन द्यायची गरज नाही, असे निर्देश मध्यंतरी न्यायालयाने दिले होते. मात्र, आता आम्ही सगळ्यांना केरोसिन उपलब्ध करण्यासंदर्भात न्यायालयाला कळवले आहे. त्यानुसार केरोसिन डिलर्सही केरोसिन देऊ शकतात. मात्र, मध्यंतरी आपण केरोसिन पूर्णपणे बंद केल्याने केरोसिन डिलर्सची साखळी तुटली होती. त्यामुळे बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल या कंपन्यांच्या पंपांवर केरोसिन उपलब्ध करुन देऊ. जेणेकरुन केरोसिनमध्ये भेसळ होणार नाही. आम्ही केंद्र सरकारच्या सातत्याने संपर्कात आहोत. एलपीजी आणि पेट्रोलियम पदार्थ मिळवण्यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. हा प्रश्न हळूहळू सुटेल. एलपीजीचा विषय हा केंद्र सरकारचा आहे. त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे, की एलपीजीचा मुबलक साठा उपलब्ध आहे.

**काळ्याबाजावर लक्ष!**

रांगा लावणे, काळाबाजार होणे यावर लक्ष आहे. अधिकार असलेल्या समित्यांची स्थापन करण्यात आली आहे. आतापर्यंत कारवाईत १२०८ गॅस सिलिंडर आणि ३३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गॅस सिलेंडरची किंमत एका महिन्यात वाढली आहे, अशीही माहिती ना. भुजबळ यांनी सभागृहात दिली.

## वसतीगृहातील समस्या...!



अमळनेर : प्रताप महाविद्यालयातील वसतीगृहातील बेसीनची दूरवस्था. दुसऱ्या छायाचित्रात प्रसाधनगृहाची झालेली दयनीय अवस्था. तिसऱ्या छायाचित्रात वसतीगृह परिसरात वाढलेले गवत व काटेरी झुडपे. शेवटच्या छायाचित्रात प्रसाधनगृहाचे निघालेले प्लास्टर व अस्वच्छता.



## पक्ष्यांची ओळख

### कर्कश आवाजाची टिटवी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**नाव :** टिटवी Lapwing
**रंग :** डोके व मान काळी,पोट पांढरे, पाठ तपकिरी, पाय पिवळे
**चोच :** लाल रंगाची
**डोळे :** लाल रंगाचे
**घरटे :** जमिनीवर नदी किंवा तलावाच्या काठी माती दगडात घरटे असते
**अंडी :** मादी एप्रिल मध्ये चार अंडी घालते. त्यांचा रंग मातकट राखाडी असून अंड्यांवर तपकिरी ठिपके असतात.
**भक्ष :** टिटवी अळ्या, सुरवंट, बारीक बिया,कोवळी पाने खाते
आवाज : टिटवी टीव टीव टीव अशा कर्कश आवाजात ओरडते. एक अंधश्रध्दा अशी आहे की टिटवीचे रात्री ओरडणे अपशकूनी मानले जातो. मात्र, सत्य हे आहे, की टिटवीला वा तिच्या पिल्लांना धोका निर्माण झाल्यास ती रक्षणासाठी ओरडते. ती धोक्याची सूचना असून अंधश्रध्देशी काहीही संबंध नाही.

**संग्राहक :**
**प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
**निसर्ग मित्र मंडळ,अमळनेर**

# पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना दरमहा २ हजार ५००

## कागदपत्रे सादर करण्याचे तहसीलदारांकडून आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील पात्र दिव्यांग लाभार्थ्यांसाठी दरमहा २५०० रुपयांचे अनुदान सुरू करण्यात येणार आहे. संबंधित लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे कार्यालयात सादर करावीत, असे आवाहन तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांनी केले आहे.

तहसीलदार सुराणा यांनी याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, की दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दरमहा २५०० रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांनी दिव्यांग प्रमाणपत्र, यूडीआयडी कार्ड, आधारकार्ड व बँक पासबुकची झेरॉक्स प्रत संबंधित तलाठी कार्यालय किंवा तहसील कार्यालयात २० मार्चपर्यंत जमा करावीत. ज्या दिव्यांग लाभार्थ्यांकडे यूडीआयडी प्रमाणपत्र उपलब्ध नाही, त्यांनी ते ई- सेवा केंद्रामार्फत तातडीने काढून घ्यावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर केल्यास पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना दरमहा २५०० रुपयांचे अनुदान सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या संदर्भात गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

# तरुणावर जीवघेणा हल्ला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील जवखेडा येथे 'माझ्याकडे पाहून का हसत होता?' असे म्हणत किरकोळ कारणावरून एका तरुणावर फायटरने हल्ला केला. ही घटना शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास जवखेडा बसस्थानकासमोर घडली. या प्रकरणी येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी सांगितले, की नेताजी वसंत पाटील हे १३ मार्च रोजी रात्री आपल्या शेतातून मोटरसायकलने घरी परतत होते. जवखेडा येथील बसस्थानकाजवळ ते पोहोचताच नितेश पंकज पाटील याने त्यांना अडवले. यावेळी "त्या दिवशी माझ्याकडे पाहून का हसत होता?" असा प्रश्न करत त्याने वाद घालण्यास सुरुवात केली. वाद वाढताच आरोपी नितेश पाटील याने संतापात नेताजी पाटील यांच्या मोटरसायकलला लाथ मारून त्यांना खाली पाडले. त्यानंतर त्याने हातातील फायटरने त्यांच्या डाव्या डोळ्याजवळ जोरदार प्रहार केला. या हल्ल्यात नेताजी पाटील यांच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली आहे. तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली.

# इस्लामपूरा भागातील टिपू सुलतान फलक हटवा!

## भाजयुमोची मागणी; मुख्याधिकाऱ्यांना दिले निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील इस्लामपुरा भागात लावण्यात आलेल्या टिपू सुलतान यांच्या फलकाविरोधात भाजयुमोने निषेध केला आहे. तो फलक तत्काळ हटवण्याची मागणी केली आहे. याबाबत भाजयुमोचे सरचिटणीस राहुल मगन चौधरी यांनी मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे, की इस्लामपुरा परिसरात लावण्यात आलेला फलक कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी कोणताही फलक किंवा नामफलक लावताना संबंधित प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते. मात्र, सदर फलक नियमांचे उल्लंघन करून लावण्यात आला आहे. अशा प्रकारच्या वादग्रस्त फलकांमुळे शहरातील काही समाजघटकांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. त्यामुळे सामाजिक सलोखा व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अमळनेर शहरात सर्व समाजामध्ये शांतता, सलोखा आणि परस्पर आदर कायम राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. इस्लामपुरा भागात लावण्यात आलेला टिपू सुलतान यांचा फलक तात्काळ काढण्यात यावा. भविष्यात अशा प्रकारचे वादग्रस्त फलक परवानगीशिवाय लावले जाणार नाहीत, यासाठी संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.



अमळनेर : मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन देताना भाजयुमोचे सरचिटणीस राहुल चौधरी. शेजारी दीपक भोई, दीपक पवार, समाधान पाटील, शिवकिरण बोरसे, नितेश कामदार, सुमित राजपूत आदी.

यावेळी भाजयुमोचे दीपक भोई, दीपक पवार, समाधान पाटील, शिवकिरण बोरसे, कल्पेश पाटील, सौरभ पाटील, बजरंग दलाचे नितेश कामदार, सुमित राजपूत, नीलेश पाटील, मनोज महाजन, अमोल महाजन, हितेश माळी, अनिरुद्ध शिसोदे, शुभम पवार, परेश जोशी, कुणाल शाह, गौरव विसपुते, प्रसाद भामरे, सागर शेटे, हर्षल शिंपी, राजेश खरारे, दुर्गेश सोनवणे उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# समाजसेवा, बालशिक्षणाचे प्रेरणादायी जीवन : अनुताई वाघ



जन्मदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील शिक्षण आणि समाजसेवा क्षेत्रात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, की ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर पुढील अनेक पिढ्यांना दिशा देणारे ठरते. अशाच थोर व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे ज्येष्ठ समाजसेविका आणि शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ. आदिवासी आणि ग्रामीण भागातील बालशिक्षणाचा प्रसार, स्त्रीशिक्षणाची जाणीव आणि सामाजिक परिवर्तनासाठी केलेले त्यांचे आयुष्यभराचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरते.

### बालपण व शिक्षण

अनुताई वाघ यांचा जन्म १७ मार्च १९१० रोजी महाराष्ट्रात झाला. लहानपणापासूनच त्यांच्यात सामाजिक जाण आणि संवेदनशीलता होती. शिक्षण घेत असतानाच समाजातील वंचित घटकांबद्दल त्यांना विशेष कळकळ वाटू लागली. पुढे त्यांनी शिक्षण आणि समाजसेवा या दोन क्षेत्रांना आपल्या आयुष्याचे ध्येय मानले.

### आदिवासी आणि ग्रामीण शिक्षणासाठी कार्य

अनुताई वाघ यांनी आदिवासी आणि ग्रामीण भागातील मुलांसाठी शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी मोठे प्रयत्न केले. त्या काळात अशा भागात शिक्षणाची सुविधा अत्यंत मर्यादित होती. अशा परिस्थितीत त्यांनी गावागावात जाऊन मुलांना शिक्षणाची गोडी लावण्याचे काम केले. त्यांच्या कार्यावर ताराबाई मोडक यांच्या बालशिक्षणाच्या प्रयोगांचा मोठा प्रभाव होता. या दोघींनी मिळून ग्रामीण व आदिवासी भागात बालवाड्यांची संकल्पना रुजवली. मुलांच्या नैसर्गिक विकासाला पोषक असे शिक्षण कसे द्यावे यासाठी त्यांनी अनेक प्रयोग केले.

### 'नूतन बालशिक्षण' संकल्पना

अनुताई वाघ यांनी बालशिक्षणात खेळातून शिकणे, अनुभवातून शिकणे आणि स्थानिक साधनांचा वापर करून शिक्षण देणे या संकल्पनांना विशेष महत्त्व दिले. त्यांनी 'नूतन बालशिक्षण' ही संकल्पना मांडली ज्यामध्ये बालकांच्या सर्जनशीलतेला आणि नैसर्गिक जिज्ञासेला प्रोत्साहन दिले जाते. त्यांनी ग्रामीण भागातील उपलब्ध वस्तूंचा वापर करून शैक्षणिक साहित्य तयार करण्याचे मार्ग दाखवले. त्यामुळे कमी खर्चात प्रभावी शिक्षण देणे शक्य झाले.

### स्त्रीशिक्षण व सामाजिक जागृती

अनुताई वाघ यांनी स्त्रियांच्या शिक्षणावरही विशेष भर दिला. त्यांनी महिलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि त्यांना सामाजिक कामात सहभागी करून घेतले. गावागावांत महिलांसाठी प्रशिक्षण वर्ग, बालसंवर्धन कार्यक्रम आणि शिक्षणविषयक उपक्रम राबविले.

### साहित्यनिर्मिती

समाजकार्याबरोबरच अनुताई वाघ यांनी शिक्षण विषयक अनेक पुस्तके आणि लेखही लिहिले. बालशिक्षणाच्या पद्धती, ग्रामीण शिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षण याबद्दलचे त्यांचे लेखन आजही मार्गदर्शक मानले जाते.

### पुरस्कार व सन्मान

अनुताई वाघ यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची दखल देशभरात घेण्यात आली. त्यांच्या योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. भारत सरकारनेही त्यांच्या कार्याचा सन्मान केला.

### समाजासाठी प्रेरणादायी वारसा

अनुताई वाघ यांचे संपूर्ण जीवन समाजासाठी समर्पित होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. आजही बालशिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्था आणि कार्यकर्त्यांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे.

त्यांचा जन्मदिन हा केवळ स्मरणाचा दिवस नसून समाजसेवा, शिक्षण आणि मानवी मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. अनुताई वाघ यांचे जीवन आपल्याला सांगते, की शिक्षण हीच समाजपरिवर्तनाची सर्वात मोठी शक्ती आहे. त्यांच्या कार्यामुळे हजारो मुलांना शिक्षणाची संधी मिळाली आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करणे हीच खरी कृतज्ञता ठरेल.

# महाराष्ट्रात बहुतांश रसवंतीगृहांची नावे 'नवनाथ किंवा कानिफनाथ' का?

